—: प्रेसनोट :— दिनांक :३०/११/२०२०

| | |
|---|---|
| ला.प्र.वि. | मुंबई विभाग |
| गु.नों.क्र. | २३/२०२० |
| कलम | ७, भष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ |
| आरोपी व कार्यालय व घरचा पत्ता. | १) श्री. भरत महादु काकड, वय— ५७ वर्षे, व्यवसाय— सहकार अधिकारी श्रेणी — १, कार्यालयाचा पत्ता :— उपनिबंधक सहकारी संस्था पी. विभाग, ठाकुर कॉम्पलेक्स कांदिवली (पूर्व), मुंबई — ६८<br>२) श्री. सचिन भरत काकड वय — ३२ वर्षे, धंदा :— खाजगी नोकरी, |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | रू. २,००,०००/— व दोन साडया |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | रू. २,००,०००/— व दोन साडया (किमंत रू. ७,५९५/—) |
| थोडक्यात हकिकत | यातील फिर्यादी रोलेक्स अपार्टमेन्ट को. ऑ. हौ. सोसायटी, एस.व्ही. रोड, न्यु एरा सिग्नलजवळ, मालाड (प), मुंबई या सोसायटीचे चेअरमन आहेत. नमुद सोसायटीच्या इमारतीच्या दुरूस्तीसाठी सोसायटीचा सिंकिग फंड वापरता यावा म्हणून सोसायटीमार्फत उपनिबंधक सहकारी संस्था पी. विभाग, ठाकुर कॉम्पलेक्स कांदिवली (पूर्व), मुंबई — ६८ याना लेखी अर्ज केला होता. नमुद अर्जानुसार परवानगी देण्याकरीता यातील लोकसेवकाने रु २,००,०००/— ची मागणी केली होती. नमुद मागणी पूर्ण न केल्याने लोकसेवकाने सोसायटीचे सेक्रेटरी याना डिफॉल्टर ठरवून कमिटी बरखास्त करण्याची नोटीस बजावली. त्यावर फिर्यादी यांनी पुन्हा लोकसेवकाशी संपर्क साधला असता लोकसेवकाने पुन्हा रु २,००,०००/— ची तसेच २ साडयाची मागणी केली.<br>परंतु फिर्यादी यांची लोकसवेकास लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई विभाग या कार्यालयास लेखी तक्रार दिली. फिर्यादीचे तक्रारीवरून पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवकाने रू. २,००,०००/— आणि २ साडयाची मागणी केल्याचे स्पष्ट झाल्याने रचण्यात आलेल्या सापळा कारवाईमध्ये लोकसेवकास त्याचे खाजगी कार्यालयात फिर्यादी यांचेकडून लाचेची रक्कम रू. २,००,०००/— आणि लोकसेवकाचा मुलगा आरोपी क्र. ०२ याला २ साडया स्विकारताना रंगेहात पकडण्यात आले. |

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबंधी काही माहिती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकाबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभागाशी संपर्क साधावा.

संपर्क : लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, बृहन्मुंबई विभाग,९१, सरपोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई.
टोल फ्री क्र. १०६४, दूरध्वनी क्र. ०२२—२४९२१२१२,
फॅक्स क्र. ०२२—२४९२२६१८,
वेबसाईट—acbmaharashtra.gov.in,
ईमेल acbwebmail@mahapolice.gov.in,
ईमेल addlcpacbmumbai@mahapolice.gov.in,
फेसबुक www.facebook.com - Maharashtra ACB.
मोबाईलॲप www.acbmaharashtra.net

(महेश मुगुटराव)
सहाय्यक पोलीस आयुक्त
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
बृहन्मुंबई विभाग, मुंबई